# मेट्रोचे अत्याधुनिक रूळ दाखल

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

जवळपास चार आठवड्यांचा प्रवास केल्यानंतर कुलाबा-वांद्रे-सिप्झ (मेट्रो ३) या मुंबईतील पहिल्या भुयारी मेट्रो मार्गावर बसवण्यात येणाऱ्या हेड हार्डन (एचएच) प्रकारातील रुळ यंत्रणेचा पहिला संच मुंबईत दाखल झाला आहे. ही रूळ यंत्रणा उच्च प्रतीची आणि अत्यल्प कंपने निर्माण करणारी म्हणजेच 'हाय एटीन्यूएशन लो व्हायब्रेशन' पद्धतीची असून भारतात प्रथमच वापरण्यात येणार आहे. अत्यल्प कंपने व ध्वनी निर्माण करणारी ही यंत्रणा मेट्रो-३ मार्गावरील हेरिटेज वास्तूंच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

ही रूळ यंत्रणा जपानच्या मितसुई कंपनीकडून मागवण्यात आली. रूळांचा हा संच जपानमधील यावाटा येथून सागरी मार्गाने निघाला होता.



## अत्यल्प कंपने निर्माण करणारे तंत्रज्ञान

चार आठवड्यांच्या प्रवासानंतर हे संच मुंबई बंदरात दाखल झाले आहेत. सद्यस्थितीत राज्याने कोविड-१९ साठी नेमून दिलेल्या नियमावलीनुसार हे रूळ लवकरच बीकेसी येथील एमएमआरसीच्या यार्डात दाखल होतील.

रूळांची यंत्रणा इतर सामान्य रूळ यंत्रणांच्या तुलनेत २० ते २२ व्हीडीबी इतकी कंपने, गती कमी करणारी




आहे. अचूक तापमान नियंत्रण आणि मजबुती ही या रूळांची वैशिष्ट्ये आहेत. मुंबई मेट्रो-३च्या बांधकामाच्या दृष्टीने ही यंत्रणा अत्यावश्यक आहे. या मार्गासाठी जून महिन्यापासून रूळ टाकण्यास सुरुवात केली जाईल, अशी

> मेट्रो-३चा भुयारी मार्ग हा अनेक हेरिटेज इमारतींखालून जातो. अशावेळी कमीत कमी कंपने आणि ध्वनी निर्माण करणारे अद्ययावत रूळ मुंबईतील हेरिटेज वास्तूंना इजा पोहचू नये, या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतील.
>
> **– रणजितसिंह देओल,**
> व्यवस्थापकीय संचालक,
> एमएमआरसी

माहिती मुंबई मेट्रो कॉर्पोरेशनतर्फे काही दिवसांपूर्वी देण्यात आली होती. त्यामुळे लवकरच हे काम हाती घेण्यात येणार असल्याचे कळते. उर्वरित ७१२५ मे. टन वजनाचे रूळ दोन टप्प्यांमध्ये यंदाच्या वर्षअखेरीस मुंबईत दाखल होणार आहेत, असे सांगण्यात आले.